17-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 16-02-2025 22:28 Page 1



## निवडक

### शिवोली येथील गणेश विश्वस्त मंडळाचा उद्या साप्ताहिक मंगळवार

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १६ :** शिवोली येथील गणेश विश्वस्त मंडळाचा साप्ताहिक मंगळवार दि. १८ रोजी बाबुसो वायगणकर यांच्या यजमान पदाखाली होणार आहे. त्यानिमित्त सकाळी अभिषेक दुपारी महाप्रसाद व संध्याकाळी ७.३० वाजता सोहम संगीत कला संस्था ओशेल शिवोली यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. यात गायक शिवा चोडणकर, प्रमोद परब, केशव शेट भाग घेणार आहे, त्यांना हार्मोनियम साथ किशोर गावकर तर तबला साथ प्रविण गावडे सात संगत करणार आहेत.

### पेडण्यात विश्वकर्मा जन्मोत्सव उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १६ :** विश्वकर्मा ट्रस्ट पेडणेतर्फे २९वा विश्वकर्मा जन्मोत्सव पेडणे व मांद्रे मतदारसंघातील भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्नेहल च्यारी व गौतमी च्यारी यांच्या यजमानपदाखाली शुद्धी होम झाल्यानंतर दुपारी विश्वकर्मा जन्मोत्सव त्यानंतर पूजा आरती तिर्थप्रसाद व महाप्रसाद झाला. जन्मोत्सवाला पेडणेचे आमदार प्रवीण आर्लेकर भगवती पंचायतन देवस्थानाचे अध्यक्ष आदित्य रावराजे देशप्रभू माजी नगराध्यक्ष शिवराम तुकोजी नामवंत गायक विश्वास मेस्त्री तोरसे पंचायतीच्या सरपंच्या छाया शेट्ये पंच प्रार्थना प्रभाकर मोटे माजी सरपंच प्रभाकर मोटे विरनोडा पंचायतीचे माजी सरपंच ॲड. सिताराम परब यांची खास उपस्थिती होती. सायंकाळी महिलांचा हळदीकुंकू त्यानंतर विद्यार्थी गौरव झाला. या कार्यक्रमासाठी आरती च्यारी सरपंच काणका पंचायत या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तसेच वारखंड नागझर पंच देविदास च्यारी व कोरगांवचे उपसरपंच उमेश च्यारी यजमान सखाराम व गुरुदास च्यारी, अध्यक्ष संजय च्यारी, उपाध्यक्ष लक्ष्मण च्यारी, संजय च्यारी, मुखत्यार च्यारी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या आरती यांनी लोकांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांची सविस्तर माहिती दिली संध्याकाळी केदार मेस्त्री दिव्या च्यारी यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला, त्यांना कार्तिक च्यारी (हार्मोनियम), विठ्ठल मेस्त्री (तबला), श्यामसुंदर च्यारी (मंजिरी) यांनी साथसंगत केली पाहुणे गायक कलाकार शौनक अभिषेकी यांचे शिष्य विश्वजीत मेस्त्री यांनी गायनात सहभाग घेतला मंडप उभारण्यात प्रवीण च्यारी यांचें मोलाचे सहकार्य लाभले संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिव सतीश च्यारी यांनी केले.

### चिखली येथील महादेव देवस्थान आज वर्धापनदिन



■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १६ :** चिखली येथील श्री महादेव देवस्थानाचा नववा वर्धापन दिन सोमवार दि. १७ रोजी साजरा होणार आहे. सकाळी ७ वाजल्या पासून विविध देव कार्याने सोहळा होणार आहे. दुपारी १ वाजता महाआरती व महाप्रसाद होणार आहे. दुपारी २ वाजल्यापासून विविध भजनी पथकांचा भजनाचा कार्यक्रम असेल. संध्याकाळी ८.३० वाजता ग्रामस्थांचे भजन व आरती आयोजित करण्यात आली आहे.

मंगळवार दि. १८ ते मंगळवार दि. २५ या कालावधीत नित्यपूजा, आरती, तीर्थप्रसाद, भजन व संध्याकाळी विविध सांस्कृतिक आणि स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार १८ रोजी वेशभूषा स्पर्धा, बुधवार दि. १९ रोजी रांगोळी स्पर्धा, गुरुवार दि. २० रोजी १२ वर्षांखालील मुलांसाठी नृत्य स्पर्धा, शुक्रवार दि. २१ रोजी १२ ते १८ वर्ष वयोगटासाठी नृत्य स्पर्धा, शनिवार दि. २२ रोजी रामायण व महाभारत प्रश्नमंजुषा स्पर्धा, रविवार दि. २३ रोजी रोटरी क्लब ऑफ वास्को पोर्ट टाऊन तर्फे महिलांसाठी विशेष कार्यक्रम, सोमवार दि. २४ रोजी चित्रकला स्पर्धा व मंगळवार दि. २५ रोजी कराओके गायन स्पर्धा होणार आहेत.

बुधवार दि. २६ रोजी महाशिवरात्री उत्सव साजरा केला जाणार असून, सकाळी ७ वाजता महाअभिषेक, त्यानंतर भाविकांकडून अभिषेक, आरती, तीर्थप्रसाद व दुपारी १ वाजता महाप्रसाद होईल. संध्याकाळी ७ वाजता स्पर्धांचे बक्षीस वितरण व ८ वाजता 'किलबिल' हा बालमंच कार्यक्रम श्री महादेव नाट्य मंडळातर्फे सादर केला जाईल. सर्व भाविकांनी सहपरिवार संपूर्ण सोहळ्यास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महादेव देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सरचिटणीस दत्तराज गांवस – ८८०६७२३५१२ यांच्याशी संपर्क साधावा.

# शैक्षणिक वर्षाची सुरुवात जूनमध्येच करण्याची माध्यमिक शिक्षक संघटनेची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** शैक्षणिक वर्षाची पारंपरिक सुरुवात जूनपासूनच कायम ठेवावी असे आवाहन ऑल गोवा सेकंडरी स्कूल टीचर्स असोसिएशनने राज्य सरकारला केले आहे. एप्रिल महिन्यात कोणत्याही विश्रांतीशिवाय शैक्षणिक वर्ष सुरु करण्याच्या सरकारच्या निर्णयावर असोसिएशनने आक्षेप घेतला असून तसे झाल्यास विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव वाढेल आणि त्यांचा अभ्यासावर विपरीत परिणाम होऊ शकतो असा दावा असोसिएशनने केला आहे.

टीचर्स असोसिएशनच्या कार्यकारी समितीने आपल्या बैठकीत एकमताने शिक्षण संचालनालयाच्या एप्रिलमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू करण्याच्या परिपत्रकाबाबत चिंता व्यक्त केली. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष सॅव्हियो सूरज व्हिक्टोरिया यांनी सांगितले की, गोवा विधानसभेने राज्याच्या भौगोलिक आणि हवामानाच्या परिस्थितीचा विचार करून जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांत कोणतीही अडचण उद्भवली नव्हती. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांसारख्या महत्त्वाच्या भागधारकांचा सल्ला न घेता हा अचानक बदल केला जात आहे, हे अवास्तव आणि अयोग्य आहे, असे सॅव्हियो यांनी स्पष्ट केले.

सॅव्हियो यांनी नमूद केले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २020 किंवा राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २०२३ मध्ये शैक्षणिक वर्ष एप्रिलमध्ये सुरू करण्याचे कोणतेही स्पष्ट आदेश किंवा निर्देश नाहीत. तसेच, राज्य शिक्षण मंडळांना सीबीएसई किंवा आयसीएसईच्या शैक्षणिक वेळापत्रकाशी जुळवून घेण्याचे बंधन नाही. भारत सरकारने असा कोणताही कायदा लागू केलेला नाही की, शैक्षणिक वर्ष एप्रिलमध्ये सुरू करणे



बंधनकारक आहे किंवा राज्य शिक्षण मंडळांनी आपले शैक्षणिक वेळापत्रक सीबीएसई किंवा आयसी एसईशी जुळवावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सॅव्हियो व्हिक्टोरिया यांच्या मते, गोव्यात माध्यमिक शिक्षणासाठी १,०४५ आणि प्राथमिक शिक्षणासाठी ९५५ वार्षिक तासांचे नियोजन आहे. सध्या गोव्यात २४२ कामकाजाचे दिवस आणि विद्यार्थ्यांसाठी २२० शालेय दिवस असतात. राज्यातील शाळांमध्ये दररोज ५ तास ४५ मिनिटे अध्यापन चालते, त्यामुळे दरवर्षी १,०४६ तासांचे शिक्षण पूर्ण केले जाते, जे शिक्षणाच्या नियमानुसार पुरेसे आहे. त्यामुळे तास वाढवण्याची गरज नाही, असे त्यांनी सांगितले. व्हिक्टोरिया यांनी स्पष्ट केले की, एप्रिलमध्ये शाळा सुरू केल्यास विद्यार्थ्यांना अत्यंत उष्णतेत अर्ध्या दिवसांचे वर्ग अटळ ठरतील.

सीबीएसई पॅटर्ननुसार फेब्रुवारी–मार्चमध्ये परीक्षा होतात आणि त्यानंतर दोन आठवड्यांची सुट्टी मिळते. आयसीएसई शाळाही १५ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा पूर्ण करतात, त्यानंतर शिक्षकांना निकाल प्रक्रियेत गुंतवले जाते आणि शेवटी दोन आठवड्यांची विश्रांती दिली जाते. मात्र, गोव्यात अचानक शैक्षणिक वर्ष एप्रिलमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेतल्यास विद्यार्थ्यांना कोणतीही विश्रांती न मिळता थेट अभ्यास सुरू करावा लागेल, जे मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या थकवणारे ठरू शकते,असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने, असोसिएशन ने राज्य सरकारला जूनपासूनच शैक्षणिक वर्ष सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. तसेच, एप्रिल महिन्यात विशेष प्रशिक्षण शिबिरे, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, उन्हाळी प्रशिक्षण आणि कौशल्याधारित कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा प्रस्ताव दिला आहे. शैक्षणिक वर्ष एप्रिलमध्ये सुरू केल्यास विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण पडेल. शिक्षक आणि पालकांचाही सुसंवाद बिघडेल. आम्ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस विरोध करत नाही, पण त्याची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून हा निर्णय घ्यावा, असे व्हिक्टोरिया यांनी सांगितले.

# लवू मामलेदार यांना शोकाकूल नागरिकांचा अखेरचा निरोप

## राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्त्यांसह आम जनतेने वाहिली श्रद्धांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १६ :** बेळगाव येथे रिक्षाचालकाच्या मारहाणीनंतर मृत्यू पावलेले माजी आमदार लवू मामलेदार यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी साडेबारा वाजता दुर्गाभाट येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबीय, सहकारी राजकीय नेते आणि नागरिकांनी डोळ्यांत अश्रू आणून त्यांना अंतिम निरोप दिला.

शनिवारी बेळगाव येथे एका रिक्षाचालकाने केलेल्या मारहाणीनंतर काही वेळातच मृत्यूने गाठलेल्या माजी आमदार लवू मामलेदार यांचे पार्थिव फोंडा उपजिल्हारुग्णालयात आणण्यात आले आणि त्यानंतर त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. यावेळी कुटुंबीय, मित्रमंडळी, राजकीय सहकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध राजकीय पक्षांतील नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या निधनाने निर्माण झालेल्या पोकळीबद्दल दुःख व्यक्त केले.

ऊर्जा मंत्री सुदिन ढवळीकर म्हणाले की,लवू माझा बालपणीचा मित्र होता. आम्ही दोघे शाळेत एकत्र होतो आणि



राजकारणातही एकमेकांसोबत होतो. राजकीय मतभेद असले तरी आमची मैत्री कायम राहिली. त्यांच्या निधनाने मी एक जिवलग मित्र गमावला आहे.

कृषी मंत्री रवी नाईक म्हणाले, ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. लवू मामलेदार हे बेळगावमध्ये वारंवार जात असत, कारण त्यांची मुलगी तिथे उच्च शिक्षण घेत होती. क्षुल्लक कारणावरून झालेल्या हल्ल्यात त्यांचा जीव गेला, ही अतिशय गंभीर बाब आहे. सरकारने या घटनेची सखोल चौकशी करावी.

मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनी श्रद्धांजली वाहताना म्हटले, 'लवू मामलेदार हे कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी आणि लोकनेते होते. त्यांच्याशी माझे विशेष स्नेहसंबंध होते. त्यांच्या निधनाची घटना माझ्यासाठी धक्कादायक आहे.

विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनीही या घटनेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आणि सांगितले की, ही घटना गंभीर स्वरूपाची असून, गोवा पोलिसांनी याचा तपास करून कठोर कारवाई करावी. आरोपींना अटक झाली असली तरी हा स्पष्टपणे खून आहे.

गोवा फॉरवर्डचे नेते विजय सरदेसाई म्हणाले, लवू मामलेदार हे सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या मृत्यूमुळे गोव्याने एक कणखर नेता गमावला आहे, त्यांच्या निधनाने आम्हा सर्वांना मोठा धक्का बसला आहे.

लवू मामलेदार यांच्या मृत्यूमागील नेमकी कारणे स्पष्ट करण्यासाठी सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी सर्वच स्तरांतून होत आहे. रिक्षाचालकाच्या हल्ल्यामागील नेमके कारण काय होते, याची तपासणी करणे आवश्यक आहे. मामलेदार यांच्या निधनाने एक तडफदार नेते, एक कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी आणि समाजहितासाठी कार्य करणारा व्यक्ती हरपल्याची भावना समाजात आहे. या दुर्दैवी घटनेची चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करण्याची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

# गावाच्या जलविज्ञान सर्वेक्षणाचा ठराव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १६ :** रविवारी नुवे ग्रामसभेत अनेक महत्त्वाच्या चर्चा आणि ठराव झाले, ज्यात गावाच्या जलविज्ञान सर्वेक्षणाचा ठराव समाविष्ट होता.सदस्यांनी नुवेचे जलविज्ञान सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला, ज्यामध्ये भूजल पातळीचे मूल्यांकन आणि गावातील सर्व जलस्त्रोतांची ओळख समाविष्ट असेल. सरपंच फ्रेडा डी'सा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला.

साळ नदीवर कयाकिंगचा मुद्दा बेट्टी मेंडिस यांनी उपस्थित केला. त्यांनी नमूद केले की बंदरांच्या कॅप्टनशी चौकशी केल्यानंतर त्यांना अशा कोणत्याही कृतीची माहिती नव्हती.सरपंचांनी पुष्टी केली की पंचायतीने कयाकिंगला परवानगी दिलेली नाही. मेंडिस यांनी सरपंचांना पुस्तिकेतून जीपीडीपी (ग्रामपंचायत विकास योजना) चा फोटो काढून टाकण्याची विनंती केली, कारण कयाकिंग ही बेकायदेशीर कृती आहे आणि सरपंचांनी तसे करण्यास सहमती दर्शविली.

ग्रामसभा सदस्या इंदिरा यांनी सुशोभीकरण प्रकल्पांचा भाग म्हणून रस्त्यालगत नुकत्याच बांधलेल्या फुटपाथच्या देखभाल आणि साफसफाईसाठी बजेटची तरतूद करण्याची सूचना केली. या प्रस्तावाला सदस्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

प्लास्टिक वापरासाठी वसूल केलेल्या दंडाबद्दल ग्रामसभा सदस्या कार्मेलिटो आंद्रादे यांनी चिंता व्यक्त केली, जो ५,हजार रुपयांपेक्षा कमी असल्याचे सांगण्यात आले. सरपंचांनी स्पष्ट केले की वसूल केलेला दंड फक्त रविवारच्या बाजाराशी संबंधित आहे आणि कचऱ्याशी संबंधित गुन्ह्यांसाठी २ लाख रुपये दंड आहे. या स्पष्टीकरणाचे सदस्यांनी कौतुक केले.चर्चेचा भाग म्हणून, सरपंचांनी शेजारच्या पंचायतींप्रमाणेच प्रति कुटुंब प्रति महिना ३५ रुपये कचरा कर लागू करण्याचा प्रस्ताव मांडला आणि सदस्यांना या प्रस्तावावर विचार करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

कार्मेलिटो आंद्रादे यांनी सरपंचांना मागील चर्चेची आठवण करून दिली जिथे सदस्यांनी नुवेमध्ये स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येसाठी घरांचे सर्वेक्षण करण्याचा सल्ला दिला होता. स्थलांतरितांचा हा ओघ गावातील कचरा समस्येत एक महत्त्वाचा घटक असल्याचे मानले जाते.सरपंचांनी नमूद केले की मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पोलिसांनी आधीच हा डेटा गोळा केला आहे आणि लवकरच पोलिसांकडून डेटा मागवला जाईल. घरांमध्ये, आऊटहाऊसमध्ये किंवा स्थलांतरितांसाठी बांधलेल्या लहान खोल्यांमध्ये राहणाऱ्या स्थलांतरितांची संख्या निश्चित करण्यासाठी पोलिसांच्या डेटावर आधारित उलट शोध घेण्याचा सल्ला कार्मेलिटो यांनी दिला.

एव्हरसन वेल्स यांनी सरकारी कचरा व्यवस्थापन प्राधिकरणाने ओळखलेल्या कचऱ्याच्या ब्लॅक स्पॉटचा मुद्दा उपस्थित केला.जरीना डी'कुन्हा यांनी भविष्यातील पाणीटंचाईबद्दल मुख्यमंत्र्यांच्या टिप्पण्यांबद्दल चिंता व्यक्त केली, जिथे असे म्हटले होते की गोव्यातील लोकांना दररोज फक्त चार तास पिण्याचे पाणी मिळू शकेल आणि अपेक्षित पाणीटंचाई लक्षात घेता जलतरण तलावांशी संबंधित कोणत्याही प्रकल्पांना मान्यता देऊ नये अशी विनंती पंचायतीला केली.

# शिवोली सडये ग्रामसभेत विकासाच्या मुद्यांवर वादळी चर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** शिवोली सडये ग्रामपंचायतीची ग्रामसभा रविवारी वादळी वातावरणात पार पडली. ग्रामस्थांनी प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली. सुरुवातीला अस्वस्थता असली, तरी नंतर शेती, तरुणांमध्ये अंमली पदार्थांचे वाढते सेवन, शिक्षण व्यवस्था सुधारणा आदी विषयांवर चर्चा झाली.

गावकऱ्यांनी पुढील ग्रामसभेत पंचायत प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांचा अहवाल सादर करण्याची मागणी केली. गावात स्विमिंग पूल बंदीचा मुद्दा उपस्थित झाला. विकासाच्या पर्रा मॉडेलवर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली, तसेच सततच्या पाणीपुरवठा समस्येवर मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नैसर्गिक जलस्त्रोत असूनही, नियमित पाणीपुरवठा होत नाही, हा प्रशासनाचा अपयश आहे, असे एका ग्रामस्थाने सांगितले.

गावकऱ्यांनी बांधकाम व्यावसायिकांकडून सीएसआर निधीतून १० लाखांचे योगदान घेण्याचा प्रस्ताव मांडला, जे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरण्यात यावे. तसेच तरुणांमध्ये ड्रग्ज, जुगार आणि मद्यपान वाढल्याबद्दल चिंता व्यक्त केली. सरकारच्या फुकट सुविधा धोरणामुळे युवक आळशी होत असून, नोकऱ्या उपलब्ध नसल्याने गुन्हेगारी वाढत असल्याचे ग्रामस्थांचे मत होते.

शेतीच्या संदर्भात, तिळ्ळारी प्रकल्पामुळे शेती संकटात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. अधिकाऱ्यांनी संवाद साधावा, अन्यथा कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी झाली. वनस्पती आणि प्राणी संरक्षण, तसेच तरुणांसाठी समुपदेशनाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सरपंच दीपा नाईक यांनी विद्यमान मुख्य रस्ता २५ मीटर रुंद करण्याच्या योजनेची माहिती दिली. मात्र, ग्रामस्थांनी या प्रस्तावाला विरोध केला. आमच्या गावाला पर्रा मॉडेल नको, असा ठाम निर्धार करण्यात आला. शेवटी, विविध लघु विकास योजनांवर चर्चा करून वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

# मांद्रे जूनसवाडा वन उद्यान्याकडे दुर्लक्ष

## संबंधित खात्याचे दर्लक्ष : पर्यटकात संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १६ :** येथील मांद्रे पंचायत क्षेत्रातील वन उद्यानाची दुर्दशा पाहून अनेकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या व सरकार तसेच वन खात्याच्या कारभाराविरुद्ध संताप व्यक्त केला आहे.

या क्षणाला अखेरच्या घटका मोजणाऱ्या उद्यानाला पूर्वपदावर आणण्यासाठी पाणी आवश्यक बनले आहे, अन्यथा घटका जवळ ठेपली, असल्याचा दावा निसर्ग प्रेमींनी केला आहे.

गेल्या महिन्यात ह्या वन उद्यानात अनावश्यक गवत वाढले होते,त्यामुळे गवतातून चालत जाणे धोक्याचे झाले होते. वर्तमान पत्रातून सचित्र बातमी प्रसिद्ध होताच, खात्याच्या अधिकाऱ्यांनी दखल घेत गवताची कापणी केली होती.

मात्र सद्या वन उद्यानातील सगळी हिरवळ, गवत वाळलेले असून पाणी पुरवठा होत नसल्याने पूर्ण वाताहत झाल्याचे दिसून आले. यामुळे पार्कमध्ये लहान मुले तसेच पर्यटक विसावा घेत असतात. मात्र त्या वाळलेल्या गवतामुळे अनर्थ घडू



जूनसवाडा : वन खात्याचा पार्क पूर्ण ओसाड बनला आहे.

नये, त्यापूर्वीच उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

प्राप्त माहितीनुसार त्या पार्कमध्ये विहीर असून, त्यात खारे पाणी असल्याने उद्यानातील झाडे,फुल झाडे तसेच हिरवळ आदींना सदरचे पाणी उपयुक्त नसल्याने व कोणीच योग्य देखभाल घेत नसल्याने उद्यान उकिरडे बनले आहे. मध्यंतरी, या उद्यानाला खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जायचा, मात्र त्याची बिले प्रलंबित असल्याने सद्या पाणी पुरवठा बंद असल्याचे खात्रीलायक समजते.

पर्यटक तसेच प्रेमींजनाना एकांत घालवण्यासाठी योग्य जागा होती तसेच कित्येक जणांसाठी उपयुक्त बनले होते.मात्र सद्याच्या स्थितीमुळे सदर पार्क बेकायदेशीर गोष्टीसाठी नावारूपास येऊ नये,ह्याची दखल मांद्रेकर मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी वैयत्किक लक्ष घालून पुनर्जीवित करावे,अशी मागणी होत आहे. तरी सरकारने वन उद्यानाबाबतीत हयगय न करता,पाणी पुरवठा करून उद्यान वाचवावे व पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या उद्यानास पुनर्जन्म द्यावा अशी मागणी होत आहे.

# बोअरवेल विषयावरून चिंबल ग्रामसभा गाजली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** चिंबल सरपंच संदेश शिरोडकर यांनी रविवारी पंचायतीच्या प्रभाग क्रमांक ७ मध्ये ७० बेकायदेशीर बोअरवेल अस्तित्वात असल्याचा दावा फेटाळून लावला आणि असा दावा केला की या परिसरात ७० घरेही नाहीत.

चिंबलच्या रहिवाशांनी १६ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत परिसरातील सुमारे ७० कथित अनधिकृत बोअरवेलबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर हे घडले.सरपंच म्हणाले की पंचायतीने कोणत्याही बोअरवेलला परवानगी दिलेली नाही.

नंतर पत्रकारांशी बोलताना पर्यावरण कार्यकर्त्या ॲना ग्रासियास म्हणाल्या, डब्ल्यूआरडीने तपासणी करून चांगले काम केले आहे. जेव्हा तपासणी केली जात होती तेव्हा असे बरेच लोक होते जे त्यांच्या घरात होते परंतु त्यांना बाहेरून कुलूप लावले होते. मला वाटते की अधिक जागेची तपासणी केली पाहिजे कारण मला खात्री आहे की परिसरात १०० हून अधिक बेकायदेशीर बोअरवेल असू शकतात. या आठवड्याच्या सुरुवातीला, जलसंपदा विभागाने चिंबलमध्ये बेकायदेशीरपणे खोदलेल्या ७० बेकायदेशीर बोअरवेलच्या मालकांना नोटिसा बजावल्या होत्या. तत्पूर्वी, ग्रामसभेने हिंदू स्मशानभूमीजवळील प्रकल्प, कचरा आणि उपयुक्तता मॉलच्या मुद्द्यावर चर्चा केली आणि नगर नियोजन विभागाचे अधिकारी आणि तक्रारदार यांच्यासमवेत स्मशानभूमीची संयुक्त तपासणी करण्याचा ठराव मंजूर केला.पत्रकारांशी बोलताना, सरपंच संदेश शिरोडकर म्हणाले, ग्रामसभेसमोर स्मशानभूमी, कचरा आणि उपयुक्तता मॉलचा मुद्दा असे तीन प्रस्ताव होते. नगर नियोजन विभागाचे अधिकारी आणि तक्रारदार यांच्यासमवेत स्मशानभूमीची तपासणी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

कचऱ्याचा प्रश्न आहे तर, कचरा शेजारच्या पंचायतीचा आहे, चिंबलचा नाही, परंतु अनावश्यकपणे आमच्या पंचायतीचे नाव खराब केले जात आहे. यावर ग्रामसभेतही चर्चा झाली. युटिलिटी मॉलबद्दल मी ग्रामसभेला सांगितले की पंचायतीला मॉलबाबत कोणताही प्रस्ताव मिळालेला नाही. मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे की पंचायत लोकांसोबत आहे. जर लोक विरोध करत असतील तर आम्ही त्यासाठी परवानग्या देणार नाही, असे ते म्हणाले.